पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ३

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - ०३/०७/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०३/०७/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.बोकड रामदास गेणभाऊ - सभापती
२) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
४) मा.भारती फरांदे
५) मा.काळे विमल रमेश

याशिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>**

विषय क्रमांक - २) महापौर चषक जिल्हास्तर हँडबॉल स्पर्धा आयोजित करणेबाबत.. मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ३) खेळाडु दत्तक योजने अंतर्गत विद्यार्थी खेळाडुंना प्रतिदिन आहारभत्ता देणेबाबत..मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४) सावित्रीबाई फुले महिला व्यायाम शाळेतील दुरुस्ती बाबत..मा. विमल काळे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ५) व्यायामशाळेत व्यायाम साहित्य देणेबाबत..मा.विमल काळे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ६) व्यायामशाळेत व्यायाम साहित्य मिळणेबाबत..मा. मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ७)वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत..मा.भारती फरांदे,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ८) महापौर चषकजिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत..मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

दिनांक १९/०६/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र. २ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४ विषय क्रमांक - १

दिनांक - ०३/०७/२०१३ विभाग – क्रीडा

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.भारती फरांदे

मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/६/कावि/६४०/२०१३दि.१/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे इंद्रायणीनगर भोसरी बॅडमिंटन हॉल दि. १/४/२०१३ ते दि.२८/२/२०१४ पर्यंत ११ महिने कराराने गतवर्षीच्या दरमहा भाडे रक्कम रुपये ७,४०७/- मध्ये १०% भाडेवाढ करुन (र.रु.७४१/-) करुन दरमहा भाडे रक्कम रुपये ८१४८/- फक्त प्रमाणे चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ५ विषय क्रमांक - २

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.भारती फरांदे

मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने पिंपरीचिंचवड हॅंडबॉल असो. यांचे सहकार्याने व पुणे जिल्हा हॅंडबॉल असो. यांच्या मान्यतेने महापौर चषक जिल्हा स्तर हॅंडबॉल स्पर्धा २०१३ – १४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु. ३,७७,०००/- ( अक्षरी र.रु. तीन लाख सत्याहत्तर हजार फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा. भारती फरांदे अनुमोदक - मा. मंदाकिनी ठाकरे

मा.भारती फरांदे, मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागांतर्गत खेळाडु दत्तक योजना राबविण्यात येत आहे. खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना मनपा राबवित असुन या योजनेचे दि.१८/०४/२०१३ रोजी उदघाटन करण्यात आलेले आहे. सध्या सदर खेळाडुंना र.रु. ५०/- दैनिक आहारभत्ता मंजुर करण्यात आलेला आहे. तथापि हा आहारभत्ता खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी व त्याच्या दैनंदिन क्रीडा विषयक नैपुण्य जोपासण्यासाठी अत्यंत अपुरा पडत असल्याचे व त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय महापालिकेने घ्यावा, असे अनेक राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडु व क्रीडा संघटनांनी त्यांचे निदर्शनास आणुन दिले आहे. त्यांची भावना अत्यंत रास्त असुन या खेळाडुंना प्रोत्साहनासाठी र.रु. ५०/- ऐवजी र.रु. २००/- प्रतिदिन असा खेळाडु आहारभत्ता मंजुर करणे आवश्यक असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खेळाडु दत्तक योजने अंतर्गत दि. २२/४/२०१३ पासुन राबविणेत येत असलेल्या खेळाडु दत्तक योजनेतील विद्यार्थी खेळाडुंना दि.२२/४/२०१३ पासुन प्रतिदिन आहारभत्ता र.रु.५०/- ऐवजी र.रु. २००/- असा मंजुर करणेस व याकामी आवश्यक ती तरतुद करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

. सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

मा.विमल काळे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.१४ मधील २४ सेक्टर मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सावित्रीबाई फुले महिला व्यायामशाळेमधील दुरुस्तीबाबत खालील मुद्दयांचा विचार करण्यात यावा.

१) महिला व्यायाम शाळेतील व्यायामाचे साहित्य काही बंद अवस्थेमध्ये आहे.

२) महिला व्यायामशाळेची रंग रंगोटी करणेबाबत..

३) खिडकीच्या काचा फुटलेल्या दुरुस्त करणेबाबत..

४) महिला व्यायामशाळेतील पडदे बदलण्याबाबत..

तरी क्रिडा समितीच्या अधिका-यांना घेऊन पाहणी करुन लवकरात लवकर योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक - ५

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

मा.विमल काळे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.३६ लांडेवाडी मध्ये लोंढे व्यायामशाळा असुन सदरच्या व्यायामशाळेत १२ ते १३ वर्षापुर्वीचे व्यायामाचे साहित्य असुन ते सर्व नादुरुस्त झालेले असल्याने व्यायामशाळेत नव्याने साहित्य देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक - ६

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.भारती फरांदे

मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

प्रभाग ३३ गवळी नगरमध्ये व्यायामशाळेसाठी इमारत बांधुन तयार असल्याने व्यायामशाळेचे साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ७

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा. भारती फरांदे अनुमोदक - मा.विमल काळे

मा.भारती फरांदे,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव..

जय मातृभुमी युवा मंच या संस्थेचे काम चांगले असल्याने त्यांना वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा जय मातृभुमी युवा मंच या संस्थेस चालवण्यास देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ८

दिनांक - ०३/०७/२०१३

सूचक - मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळात गणेश महल भोईर नगर चिंचवड

पुणे ३३ महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०१३ चे आयोजित करण्यात येत आहे तरीपिंपरीचिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करणेस व त्या कामी येणा-या र.रु. २०००००/- च्या खर्चास मान्यता घेणे व कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, प्राप्त झालेल्या मंजुर दरानुसार ट्रॉफिज, स्मृतीचिन्हे, चहा व अल्पोपहार व्यवस्था, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर्स तयार करुन घेणेस व भांडार विभागाकडील निविदा मंजुर दरानुसार निमंत्रणपत्रीका, सर्टिफिकेट्स खरेदी करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
सभापती
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ६२१/२०१३
दिनांक - ०६/०७/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.